**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार**

तक्रार क्रमांक - १३३/२०२०/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| अपिलार्थी | उत्तरवादी |
| --- | --- |
| श्री. यासीन बाबू शेख | जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ड- क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे. |

(निर्णय दिनांक- १२.०२.२०२५ )

तक्रारदार यांनी दिनांक ०७.१२.२०२० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारी मध्ये ' अपील क्रमांक ८६३/२०१७/ पुणे याप्रकरणी आयोगाच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ड क्षेत्रीय कार्यालय यांनी अद्याप माहिती दिली नाही ' अशा आशयाची मागणी तक्रारदार यांनी आयोगाकडे केलेली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ मधील तरतुदीमध्ये तक्रार प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष सुनावणी घेण्यासंदर्भात कोणतीही स्पष्ट तरतूद नमूद केलेली नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (९) नुसार राज्य माहिती आयोग तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

तक्रारदार यांच्या तक्रारीतील नमूद द्वितीय अपील क्रमांक ८६३/२०१७/ पुणे याप्रकरणी आयोगाने 'जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिलेला आहे, अपिलार्थीने २-३ विभागाची माहिती मागितलेली आहे, ती व्यापक स्वरुपाची माहिती आहे, माहिती तयार होत नाही, त्यामुळे पुरविली जात नाही 'असे निरीक्षण नोंदवून सुनावणीअंती अपील निकाली काढण्याचे आदेश पारित केले आहेत.

उपरोक्त वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर तक्रारदार यांचे द्वितीय अपील आयोगाने कोणत्याही निर्देशाविना निकाली काढले असल्याने सदर तक्रार अर्जावर आयोगाच्या स्तरावर वेगळ्याने कार्यवाही अपेक्षित नाही. सबब आयोग सदर तक्रार निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत येत आहे.

आदेश

तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ पुणे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

तक्रार क्रमांक - १३३/२०२०/पुणे 7383/2025

दिनांक- 6/3/2025